# जेव्हा पल्लवीआत्या सुलताना झाली !

## लेखक : हरजिंदर सिंह 'लाल्टू'

पल्लवकाका आठवतात नं? अरे, तेच ते, मीतचे काका; हैदराबादचे! त्यांची बहीण पल्लवीआत्या इस्रोमध्ये काम करते. इस्रो म्हणजे जिथून अवकाशात उडणारी यंत्रं पाठवली जातात. इंग्रजीत 'इंडियन स्पेस रिसर्च' वगैरे म्हणतात नं, म्हणून त्याची पहिली अक्षरं आणि ओ यांचं मिळून झालं इस्रो. तर या वेळी, जेव्हा दसऱ्याच्या सुट्टीमध्ये ती मीतच्या घरी आली, तेव्हा प्रीतो आणि शबनम चार उड्यांतच त्याच्या घरी जाऊन पोचले. मीतने सांगितलं होतं, की पल्लवीआत्या केळ्याचा हलवा घेऊन आली आहे; खूप चविष्ट असतो तो. तसं तर पल्लवकाका किती मजेशीर गोष्टी सांगतात, मग पल्लवीआत्या पण नक्कीच गोष्ट सांगेल.

हवा तर इतकी छान आहे, की बाहेरच खेळायला हवं. पण केळ्याचा हलवा चाखायची इच्छा होतेय. या वेळी सुट्टीमध्ये गृहपाठ सुद्धा कमीच दिलाय. शिक्षकांना सुद्धा माहीत आहे, की दसऱ्याच्या जत्रेबित्रेत फिरल्यानंतर लिहायला-वाचायला मुलांकडे वेळ तरी कुठे उरतो.

वाटलं होतं, त्यापेक्षा पल्लवीआत्या जास्त गोड होती. शबनमला तर तिने मांडीवर घेऊन तिचे पापे घेतले. मांडीवरूनच शबनमने विचारलं,

"आत्या, तू पण आम्हाला पल्लवकाकांसारखी गोष्ट सांगशील नं?"

पल्लवीआत्या म्हणाली, “अरे बाबांनो, गोष्ट-बिष्ट मला कुठे येतेय.”

प्रीतोला राहवलं नाही, ती म्हणाली, “वर्गात आम्हाला मॅडमनी सांगितलं होतं, की चंद्रयानाचं काम सगळ्या वैज्ञानिक आंट्यांनी केलं होतं. मग तुम्ही रॉकेटची गोष्ट सांगा नं.”

“ते होय. इथपर्यंत ती खबर पोचली सुद्धा? हो, अंतराळयानावर तर मी काम केलं आहे. बरं चला तर, सांगते मी.”

“ये-ए-ए....”, मीतने जोरात ओरडत टाळ्या वाजवल्या.

“अरे, जरा शांत बसा. मला जरा विचार करू दे.” सगळेजण शांत बसले. पल्लवीआत्या खिडकीतून बाहेर पाहत होती. बाहेर उन्हामध्ये कदंबाची पानं शरद ऋतूच्या हवेमध्ये झोके घेत होती.

“चला, मी तुम्हाला रझिया सुलतानाच्या भेटीची गोष्ट सांगते.”

प्रीतो म्हणाली, “छट! तुम्ही रझिया सुलतानाला कसं भेटू शकता, ती तर एक हजार वर्षांपूर्वी दिल्लीची राणी होती.”

“अगं, हीच तर अंतराळात फिरण्याची मजा आहे. जर तुम्हाला हवे असेल, तर तुम्ही हजार वर्षं पुढे किंवा मागे जाऊ शकता.” प्रीतोने आपली मान खाली घातली होती, कारण तिच्या ओठांवर विचित्र हास्य होतं आणि पल्लवीआत्याने ते बघू नये, असं तिला वाटत होतं.

शबनमने आश्चर्याने विचारलं, “ तू रॉकेटमधून हजार वर्षं मागे गेली होतीस? जर मी रॉकेट चालवलं, तर मी पण जाऊ शकेन का ?”

" ते तुझ्या रॉकेटवर अवलंबून आहे. जर ते घेऊन गेलं, तर तू नक्की जाशील, शब्बो. पण आता तुम्ही गप्प राहून ही गोष्ट ऐका."

पल्लवीआत्याने डोळे मिटून घेतले. ती आता पुढे काय सांगतेय त्याची प्रत्येक जण वाट पहात होता. फक्त प्रीतो आपल्या मोबाईल फोनवर विकिपीडिया बघत होती, की रझिया सुलतानाबद्दल काय माहिती दिली आहे. यातच मीतची आई सगळ्यांसाठी केळ्याचा हलवा घेऊन आली. पण प्रीतोशिवाय त्याच्याकडे कोणी पाहिलंही नाही. प्रीतोने चमच्याने हलवा तोंडात टाकला. वाह! हा तर खरंच स्वादिष्ट आहे.

पल्लवीआत्याने डोळे उघडले आणि समोर चहाचा कप बघितला. चहा फक्त



तिच्यासाठीच आला होता. तिने चहाचा एक घोट घेतला आणि म्हणाली, "रॉकेटमध्ये एक बटण असतं, ते दाबल्यावर आपण काळामध्ये पुढेमागे जाऊ शकतो. तुम्हाला वाटलं, तर तुम्ही गांधीजींना भेटू शकता, किंवा देशाच्या पुढच्या पंतप्रधानांना भेटू शकता."

'काका आणि आत्या, दोघांची एकसारखी नावं आणि दोघेही महागप्पिष्ट!' प्रीतोने मनातल्या मनात विचार केला, 'चला, ऐकू या, काय सांगतेय ते.'

“तर, भविष्यामध्ये जावसं मला कधीच वाटत नव्हतं. मला नेहमी ऐतिहासिक कथा चांगल्या वाटतात, म्हणून मी मागच्या काळात गेले.”

मीतची आई सुद्धा हसत हसत तिथे येऊन बसली. पल्लवीआत्या तिच्याकडे बघून जशी काही डोळ्यांनीच काहीतरी बोलली आणि जोरजोरात हसू लागली.

“तर, मी किती मागे जातेय याचा मला तर पत्ताच नव्हता. आणि माझं रॉकेटवालं विमान वावटळीत अडकलं आणि अचानक जमिनीला टक्कर देऊन उभं राहिलं.”


शबनमच्या घशातून अस्फुट किंकाळी निघाली.

“मी जेव्हा विमानाचा दरवाजा उघडला, तर काय, मी एका जंगलात येऊन पोचले होते. मी दोन-चार पावलंच चालले असेन, एकदम काही लोकांनी मला घेरलं. त्यांच्या हातामध्ये भाले होते. ते सगळेजण शिपायासारखे दिसत होते, पण इतिहासाच्या पुस्तकातून आल्यासारखे. डोक्यावर पगड्या, घट्ट पायजम्यावर कुर्ता आणि त्यावर उपरणी बांधलेली होती. त्यांनी थोडा वेळ माझ्याकडे बघितलं आणि मग माहीत नाही काय कानगोष्टी केल्या, सगळेजण माझ्यासमोर जमिनीवर लोटांगण घालून कुर्निसात करायला लागले. पहिल्यांदा तर मी घाबरलेच, पण त्यांना लोटांगण घातलेलं पाहून हिम्मत आली आणि मी विचारलं, ‘कोण आहात तुम्ही?’ त्यांच्यातला एक जण उभा राहून म्हणाला, ‘आम्ही अमीर-अल-उमरा जमाल्लुद्दिन याकूत यांचे निष्ठावंत शिपाई आहोत. मी या तुकडीचा मुख्य शिपाई आहे. माझं नाव गुणवंत.”

“एवढं मोठं नाव?” मीतने विचारलं.

“अरे नाही. नाव फक्त जमाल्लुद्दिन याकूत होतं. त्याला ‘अमीर-अल-उमरा’ ही पदवी मिळाली होती. म्हणजे तो अमीरांचा अमीर होता.” प्रीतोला कळलं होतं, की कोणालाच काही कळलेलं नव्हतं. पण ती गप्प बसली.

“तर नंतर ते म्हणाले, ‘मलिका-ए-हिंद, सुलताना बखूब अल-दुनिया, माफी असावी. आम्हाला समजत नव्हतं की तुम्ही या लोखंडी झोपडीत काय करत आहात आणि तुमचे हे लोखंडी घोडे कुठून आले’.”



पल्लवीआत्या दोन क्षण थांबली आणि हसत म्हणाली, “मी विमानातून बाहेर पडताच माझ्या बरोबर दोन रोबोसुद्धा बाहेर पडले होते नं. त्यांना बघूनच त्यांना वाटलं की हे लोखंडी घोडे आहेत. आणि ते रोबो इकडेतिकडे फिरत होते. त्यातला एकजण अचानक म्हणाला - ‘संपवू का मी या हल्लेखोरांना?’ त्याचं बोलणं त्या शिपायांना समजलं नाही, पण त्याला असं बोलताना पाहून ते उडी मारून उभे राहिले आणि घाबरून लटलट कापायला

लागले. मी रोबोला समजावलं, की ‘हे चांगले शिपाई आहेत. आपल्याला यांच्याबरोबर लढाई करायची नाही’.”

आता शबनमनेच नाही तर मीतनेही ‘आ’ वासला होता. प्रीतोला वाटलं की अचानक त्यांच्या तोंडात बोट घालूया, पण ती गप्प बसून राहिली.

मग आत्या म्हणाली, “मी त्यांना विचारलं की त्यांना माझं नाव माहीत आहे का?”

“गुणवंत वाकून मुजरा करत म्हणाला. ‘आपलं नाव कोण जाणत नाही मलिका-ए-हिंद, आपण रझिया सुलताना म्हणजे रजिय्यात-उद-दुनिया-वा-उद्दीन आहात, संपूर्ण हिंद देशाच्या जनतेच्या संरक्षक नूर-ए-सल्तनत’.”

“आता हळूहळू माझ्या लक्षात आलं, की ते मला ‘रझिया सुलताना’ समजत होते. मी त्यांना म्हटलं की मला भूक लागली आहे, चला काहीतरी खाऊपिऊ या.”

“ ‘जसा हुकूम मलिका’ असं म्हणून, ते माझ्या पुढेमागे उभे राहिले, जशी एखादी खाशी स्वारीच निघाली आहे. गुणवंत एका पांढऱ्याशुभ्र घोड्याचे लगाम पकडून उभा होता, की मी त्याच्यावर स्वार व्हावं. मी थोडं घाबरले, पण मी माझ्या एका रोबोला म्हटलं, ‘इकडे ये आणि मला त्या घोड्यावर चढव. रोबो जवळ आला, तसा गुणवंत घाबरून मागे सरकला. मी घोड्यावर बसून त्यांच्याबरोबर निघाले. साधारण दहा मिनिटांत आम्ही एका सैनिक तळावर पोचलो. मला पाहून शिबिराच्या समोर उभे असलेले शिपाई कानात कुजबुज करू लागले आणि सलाम करून सावधानीत उभे राहिले. मी घोड्यावरून उतरले आणि राहुटीच्या आत गेले. जोपर्यंत मी बोलावत नाही, तोपर्यंत त्यांनी बाहेरच थांबावं, असं मी माझ्या दोन्ही

रोबोंना आत जाताना सांगितलं. आणि आत जाताच मी पाहिलं, की - ओ माय गॉड! तिथे अगदी माझ्यासारखी दिसणारी, दागिन्यांनी मढलेली एक बाई सिंहासनावर बसलेली होती. तिच्या बरोबर खाली शानदार गालिच्यावर लोडाला टेकून एक सावळा माणूस बसला होता. राणीने माझ्याकडे पाहिलं आणि रागाने म्हणाली, 'मला माझ्या हेरांकडून खबर मिळाली, की माझ्यासारखी दिसणारी एक बाई सुलताना बनून फिरते आहे. कोण आहेस तू? लवकर सांग, नाहीतर या क्षणी तुझं डोकं उडवून टाकीन.' मी समजले की हीच रझिया सुलताना आहे आणि तो सावळा माणूस तिचा खास मित्र याकूत आहे.

"राहुटीत आम्ही फक्त तिघंजण होतो. त्यांच्याजवळ उघड्या तलवारी होत्या. एका क्षणी मला वाटलं, की मी या जगातून चालले आता, इथून जिवंत बाहेर पडणं अशक्य आहे. मी मान खाली घालून म्हटलं, 'मलिका-ए-हिंद,



मी सुलताना व्हावं असा माझा कोणताही हेतू नाही. मी एका वेगळ्या जगातून आले आहे. वाटलं तर तुम्ही एक मिनिट बाहेर येऊन पहावं, माझे रोबो तुम्हाला सगळं समजावून सांगतील'."

"रझिया झटकन उठली, तिने एकदा याकूतकडे पाहिलं आणि राहुटीतून बाहेर आली. मी आणि याकूत तिच्यामागे बाहेर आलो."

“रझियाने दोन्ही रोबो पाहिले. मी त्यांना म्हटलं, ‘सांगा यांना की आपण कोण आहोत आणि इथे कसे आलो आहोत’.”

“एक रोबो म्हणाला, ‘आम्ही यांची भाषा शिकण्याचा प्रयत्न करतो आहोत. आमचे प्रोसेसर त्यावर काम करत आहेत. त्यामुळे आम्ही थोडंफारच समजावू शकू’.”

“एवढं बोलून, थोडं फारशी, थोडं तुर्की भाषेत तो रोबो रझियाला आपला काळ म्हणजे आपल्या जगाबद्दल सांगू लागला. काहीच क्षणांत रझिया जोरजोरात हसू लागली आणि म्हणाली, ‘तुझ्या मालकिणीने चांगलंच मूर्ख बनवलंय आम्हाला. जर तुम्ही खरं बोलत असाल, तर ज्या बनावट जगाच्या गोष्टी तुम्ही मला सांगत आहात, ते तुमचं जग मलाही दाखवा कसं आहे ते’.”

रोबो मला म्हणाला, ‘ताई, तुम्ही थोडा वेळ इथे बसा, आम्ही यांना एकविसावं शतक दाखवून आणतो’. मी घाबरत होते. पण आता दुसरा काही उपायच नव्हता. इथे डोक्यावर तलवार टेकवलेली होती. याकूतने रझियाच्या कानात काहीतरी सांगितलं. रझियाने ताबडतोब हुकूम सोडला, ‘सगळेजण ऐका. मी थोड्या वेळात परत येते, तोपर्यंत या बाईसाहेब दिल्लीला जाऊन साम्राज्य सांभाळतील’.”

“मग काय,” म्हणून पल्लवीआत्याने टाळी वाजवली. “मी दिल्लीला पोचले आणि सिंहासनावर जाऊन बसले. पण बाप रे. तिथे तर प्रत्येक क्षणी धोका होता. याकूत येऊन सांगे, की सगळे अमीर-उमराव तख्त पालटायचं षडयंत्र रचत आहेत. भीतीमुळे मला रात्री झोप येत नसे. पण काय ती ऐश - ओ हो ! दरबार भरल्यावर केवढा थाटमाट, केवढं वैभव!”

“तुम्ही तर दर रोज केळ्याचा हलवा खात असाल ना ?” शबनमने विचारल्यावर आत्या जोरजोरात हसू लागली. “ तेव्हा काय काय मिठाई खाल्ली मी, काय सांगू. बकलावा हलवा, डबल मिठाई (शाही तुकडा); काय नाही खाल्लं मी.”

प्रीतोने तोंड उघडले, “पण त्यांना ‘डबल’ कशाला म्हणतात, हे तर माहीत नव्हतं ना.” पण आत्याने तिच्याकडे लक्ष दिलं नाही.

मग आत्या म्हणाली, “पण शेवटी आम्हाला तिथून पळावं लागलं. एका सरदाराने दिल्लीवर स्वारी केली. त्याच लढाई दरम्यान रझियाला घेऊन माझं विमान परत आलं. रझिया विमानातून उतरल्यावर खूप वेळ ‘तौबा, तौबा’ म्हणत राहिली. तिला आपल्या काळातले लोक आवडले नाहीत. नंतर तिथे काय काय झालं ते मला माहीत नाही. मी तर धावतच विमानात शिरले आणि हे बघा, आता इथे बसलेय.”

“तुझे रोबो कुठे आहेत, आम्हाला पण दाखव नं?”

“आता मला काय माहीत होतं, की तुम्हाला ही सगळी कहाणी सांगेन म्हणून. पुढच्या वेळी येईन, तेव्हा त्या दोघांना बरोबर घेऊन येईन.”

प्रीतोला राहवलं नाही, “आत्या, तू अंतराळशास्त्रज्ञ नाही, तर गोष्टी सांगणारा ‘दास्तानगो’ व्हायला हवं होतंस.” पल्लवीआत्या जरा उदासशी झाली. मग म्हणाली, “चला, मी नाही होऊ शकले, तुम्ही तरी नक्की व्हा.”

मीतची आई म्हणाली, “ खरं आहे. चला, आता सगळेजण आपापल्या घरी जा बघू. आत्याला आराम करू दे.”

परत जायच्या आधी, पुन्हा एकदा शबनम पल्लवीआत्याच्या मिठीत होती. प्रीतोच्याही मनात आलं, की जर, ती सुद्धा काळाच्या मागे जाऊन शबनमसारखी लहान मुलगी होऊ शकली असती, तर तिला सुद्धा शबनमसारखं पल्लवीआत्याकडून लाड करून घ्यायला आवडलं असतं!

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १५४ मधून साभार.*

§§§

---

**लेखक : हरजिंदर सिंह 'लाल्टू',** सेंटर फॉर कम्प्यूटेशनल नॅचरल सायन्स अँड बायोइन्फॉर्मेटिक्स, आय.आय.आय.टी, हैदराबाद येथे प्राध्यापक. प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी, युएसए मधून पीएचडी. हिंदी कविता आणि कथा लिहितात.

**सर्व चित्र : सौम्या मेनन**, चित्रकार आणि ॲनिमेशन फिल्मकार.

**अनुवाद : संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात कार्यरत.

**इ-मेल :** saaphale@rediffmail.com

***(कळीचे शब्द :-* कथा, विज्ञान कथा, अंतराळ, story, science fiction, space)**